परंतू, आणखी असे की, कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे जाणीवपुर्वक उल्लंघन केल्यामुळे तिला सोसाव्या लागलेल्या कोणत्याही नुकसानीची अथवा क्षतिची जिल्हाधिकारी व्दारे भरपाई देण्यात येणार नाही.

पुन्हा असे घोषित करण्यात येते की, सदरहू भुमी संपादन कायद्याचे कलम ११ च्या पोट कलम (५) अन्वये जिल्हाधिकारी हे भूमीसंपादन पुनवर्सन व पुनःस्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम २०१३ (यापुढे ज्यांचा उल्लेख उक्त नियम असा करण्यात येईल) चे नियम १० मधील उपनियम (३) अन्वये भूमी अभिलेख अद्यावत करण्याचे कामी हाती घेतील.

आणि म्हणून त्याअर्थी समुचीत शासन म्हणून जिल्हाधिकारी सदरहू कायद्याचे कलम ३ पोटकलम (ग) अन्वये उपजिल्हाधिकारी भूसंपादन जायकवाडी प्रकल्प औरंगाबाद यांना पदनिर्देशित करित आहे.

अनुसूची -१

**भूमी वर्णन :** मोजणी प्रमाणे

**गावाचे नाव :** मौजे हकीगतपुर, मांजरी, मुददेश वाडगांव **ता.** गंगापुर **जि.** छ.संभाजीनगर

मौजे हकीगतपुर

| अ.क्र. | सर्व्हे नंबर / गट नंबर | अंदाजे क्षेत्र(हे.आर) |
|---|---|---|
| १ | १६ | ०.०३ |
| २ | १६ | ०.०३ |
| ३ | १६ | ०.०३ |
| ४ | १६ | ०.०३ |
| ५ | १६ | ०.०५ |
| ६ | १७ | ०.०५ |
| ७ | १७ | ०.०७ |
| ८ | १७ | ०.०७ |
| ९ | १७ | ०.०५ |
| १० | १८ | ०.१२ |
| ११ | १८ | ०.१२ |
| १२ | १५ | ०.४४ |
| १३ | १४ | ०.३८ |
| १४ | १४ | ०.०२ |
| १५ | १४ | ०.०४ |
| १६ | १४ | ०.०४ |
| १७ | १३ | ०.०९ |
| | **एकुण** | **१.६६** |

**मौजे मांजरी**

| अ.क्र. | सर्व्हे नंबर / गट नंबर | अंदाजे क्षेत्र(हे.आर) |
|---|---|---|
| १ | २२५ | ०.०९ |
| २. | २२५ | ०.०५ |
| ३ | २२५ | ०.०३ |
| ४ | २२५ | ०.०३ |
| ५ | २२५ | ०.०३ |
| ६ | २२५ | ०.०३ |
| ७ | २२४ | ०.०२ |
| | **एकुण** | **०.२८** |

**मौजे मुददेशवाडगांव**

| अ.क्र. | सर्व्हे नंबर / गट नंबर | अंदाजे क्षेत्र(हे.आर) |
|---|---|---|
| १ | ३५ | ०.३१ |
| २. | ३६ | ०.२६ |
| ३ | ३७ | ०.३० |
| | **एकुण** | **०.८७** |
| | **एकुणात एकुण** | **२.८१** |

**संपादनाचे प्रयोजन :** नांदूर मधमेश्वर शाखा कालवा क्र. १ वितरीका ०१ (ब) मौजे हकीगतपुर,मांजरी, मुददेश वाडगाव ता. गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर

**अनुसूची -२**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाचे विवरण :-** याप्रकल्पाद्वारे जमिनीस सिंचनाचा फायदा होणार आहे.

**प्रकल्पाचे नाव :-** नांदूर मधमेश्वर शाखा कालवा क्र. १ वितरीका ०१ (ब) मौजे हकीगतपुर,मांजरी, मुददेश वाडगाव ता. गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर अे.आर.क्र. ३/२००९

**प्रकल्पाच्या कामाचा तपशिल :-** नांदूर मधमेश्वर प्रकल्प शाखा कालवा क्र. १ वितरीका ०१ (ब) मौजे हकीगतपुर,मांजरी, मुददेश वाडगाव ता. गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर अे.आर.क्र. ३/२००९

**सामाजिक फायदे :-** याप्रकल्पाद्वारे जमिनीस सिंचनाचा फायदा होणार आहे.

**अनुसूची -३**

**बाधीत व्यक्तीचे विस्थापनाच्या आवश्यकतेसाठी कारणे :-** विस्थापनाची आवश्यकता नाही.

**सबब माहिती :** निरंक

**अनुसूची - ४**

सामजिक परिणामाचे निर्धारण गोषवारा :-

(सामाजिक परिणामाचे निर्धारण करणाऱ्या यंत्रणेने दिल्याप्रमाणे)

१. महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक १३.०३.२०१५ नुसार उक्त अधिनियमाचे प्रकरण २ व ३ मधील तरतुदी प्रमाणे लागु करण्यापासुन सुट प्राप्त.

२.महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक २६.०४.२०१८ नुसार उक्त अधिनियमांचे प्रकरण २ व ३ मधील तरतुदी लागु करण्यापासुन सुट प्राप्त

**अनुसूची -५**

१. नियुक्त केलेल्या प्रशासकाबाबत माहिती

ज्या अधिकाऱ्याची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे त्याचे पदनाम :- आवश्यकता नाही.

२. सबब माहिती निरंक

३. प्रशासकाचे कार्यालयाचा पत्ता :- निरंक

प्रशासकाची नियुक्ती ज्या अधिसुचेनेनुसार झाली आहे त्याचा तपशील - निरंक

टिप :- उक्त जमिनीचा / जमिनीच्या योजनेचे (प्लॅनचे) निरीक्षण उपजिल्हाधिकारी भूसंपादन जायकवाडी प्रकल्प छत्रपती संभाजीनगर यांच्या कार्यालयात करता येईल.

दिनांक : २१ /०१ /२०२६.
ठिकाण : छत्रपती संभाजीनगर

**(एकनाथ कांता दत्तात्रय बंगाळे)**
उपजिल्हाधिकारी
भूंसपादन जायकवाडी प्रकल्प
छत्रपती संभाजीनगर

**४**

**जिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर यांजकडून**

**भूसंपादन, पुनर्वसन व पुर्नस्थापना करतांना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३**

**अधिसूचना कलम -१९**

**जा.क्र. २०२५/भूसंपादन/जा.प्र./कावि/**

**दिनांक १५/०९/२०२५**

अे.आर.क्रमांक ४३/२००५ ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी यांचे मार्फत उपजिल्हाधिकारी, भूसंपादन, जायकवाडी प्रकल्प, छत्रपती संभाजीनगर यांनी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त व अधिनियम छ असा केला आहे) यांच्या कलम ११ च्या पोटकलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन अधिसूचना **शासन राजपत्र क्र. ५२ गुरुवार ते बुधवार, डिसेंबर / जानेवारी २६-१, २०२४/ २०२५:पौष ५-११, शके १९४६ पान क्र. १७२९, १७३० दैनिक सामपत्र ३०.१२.२०२४, दैनिक नवा मराठा ३०.१२.२०२४ अन्वये** प्रारंभिक अधिसुचना काढली आहे. त्याद्वारे असे अधिसुचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची दोन मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, उपजिल्हाधिकारी, भूसंपादन, जायकवाडी प्रकल्प, छत्रपती संभाजीनगर यांचेकडे कलम १५ च्या पोट कलम (२) अन्वये कोणत्याही खातेदारांनी आक्षेप नोंदविला नाही. उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपारीत करण्याची आवश्यकता आहे याबाबतची खात्री पटली आहे. आणि म्हणून उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे या द्वारे घोषित करण्यात येत आहे.

आणि त्याअर्थी उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी, भूसंपादन, जायकवाडी प्रकल्प छत्रपती संभाजीनगर यास पदनिर्देशीत करीत आहे.

**अनुसूची - एक**

**जमिनीचे वर्णन**

**गाव** :- देभेगाव **तालुका** :- कन्नड **जिल्हा**:- छ.संभाजीनगर

| अ.क्र. | गट क्र. | एकुण संपादीत क्षेत्र | शेरा |
|---|---|---|---|
| १ | ३२८ | ०.१८ | |
| २ | ३२९ | ०.१८ | |
| ३ | ३३० | ०.१८ | |
| ४ | ३३० | ०.१८ | |
| ५ | ३३१ | ०.२१ | |
| ६ | ३३२ | ०.१२ | |
| ७ | ३३२ | ०.१२ | |
| ८ | ३३८ | ०.१३ | |
| ९ | ३३९ | ०.१४ | |
| १० | ३८८ | ०.१२ | |
| ११. | ३८९ | ०.१२ | |
| १२ | २८४ | ०.०१ | |
| १३ | २८४ | ०.०६ | |
| १४ | २८४ | ०.०९ | |
| १५ | २८४ | ०.१६ | |
| १६ | २९२ | ०.१२ | |
| | **एकुण** | **२.१२** | |

**अनुसूची - दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण**

**प्रकल्पाचे नाव :** शिवना टाकळी डावा कालवा वितरीका क्र. १ ची लघु वितरीका क्र. १ व २ मौजे देभेगांव ता.कन्नड, जि छत्रपती संभाजीनगर अे.आर.क्र . ४३/२००५

**प्रकल्पाचे कामाचे वर्णन :-** शिवना टाकळी डावा कालवा वितरीका क्र. १ ची लघु वितरीका क्र. १ व २ मौजे देभेगांव ता.कन्नड, जि छत्रपती संभाजीनगर अे.आर.क्र . ४३/२००५

**समाजाला होणारे लाभ** : -

अ. या प्रकल्पाद्वारे जमिनीस सिंचनाचा फायदा होणार आहे.

ब. या योजने अंतर्गत कन्नड तालूक्यातील आवर्षणग्रस्त गावांना त्यांचा लाभ होणार आहे.

क. या योजने मुळे देभेगाव ता. कन्नड या गावाचे क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे.

**अनुसूची - तीन**

**बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे**

मौजे देभेगांव तालुका कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर शिवना टाकळी डावा कालवा वितरीका क्र. १ ची लघु वितरीका क्र. १ व २ मौजे देभेगांव ता.कन्नड, जि छत्रपती संभाजीनगर अे.आर.क्र . ४३/२००५ येथील ०२ हे. १२ आर. संपादित करावयाच्या सदर क्षेत्रामध्ये फक्त शेत जमीन येत असून गावठाणे विस्थापित होत नाही. सबब विस्थापितांचे पुनर्वसन करण्याची आवश्यकता नाही.

**अनुसूची - चार**

**(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करण्याच्या अधिकाराने दिलेला सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश)**

निरंक

**अनुसूची पाच**

**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील**

अ. प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांचे पदनाम :- लागु नाही

ब. प्रशासनाच्या कार्यालयाचा पत्ता :- निरंक

क. ज्या अधिसुचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे . त्या अधिसूचनेचा तपशील :- निरंक

टिप : उपजिल्हाधिकारी, भूसंपादन, जायकवाडी प्रकल्प, छत्रपती संभाजीनगर या कार्यालयात निरिक्षण करता येईल.

दिनांक : /०९/२०२५

ठिकाण : छत्रपती संभाजीनगर

**(दिलीप कमळाबाई विरपक्षप्पा स्वामी भाप्रसे)**
**जिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर .**

---

**५**

**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जालना यांजकडून**

**अधिसुचना**

महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम ४(४) व ५(२) अन्वये रेशीम कोष बाजार क्षेत्र घोषीत करणे बाबत.

**वाचा :-** १. महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ मधील कलम ३, ४ व ५ (२) त्या अंतर्गतचे नियम ११६७ मधील नियम ३ व नियम ४ मधील तरतुद

२. महाराष्ट्र शासन अधिसुचना कृषि व सहकार विभाग, मंत्रालय मुंबई दि.०५ सप्टेंबर, १९८१

३. मा. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे परिपत्रक क्र. सीएमआर/२५/ ॲक्ट/रुल्स/ दि.१८.०९.१९८१

४. रेशीम कोष अधिकारी, जालना यांचे पत्र जा.क्र. रेशीम/जालना/रेशीम को. बाजारपे/२०२४-२५/११२१ दि.०८.१०.२०२४

५. रेशीम कोष अधिकारी, जालना यांचे पत्र जा.क्र. रेशीम / जालना/रेशीम को. बाजारपे/ २०२४-२५/२२४ दि.०५.०६.२०२५

६. सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, जालना यांचे पत्र जा.क्र.१७३० दि.११.१०.२०२४

७. प्रशासक, कृषि उत्पन्न बाजार समिती, जालना यांचे पत्र जा.क्र.१००७ दि.१२.०६.२०२५

८. सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, जालना यांचे पत्र जा.क्र.१०९६ दि. ३०.०६.२०२५

९. या कार्यालयाचे पत्र जा.क्र. जिउनि कृउबासजालना/रेशीमकोष बाजारपेठ/१३७८/२०२५ दि.१०.०७.२०२५

१०. मा. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र जा.क्र. पणन-५/कृउबासजालना / रेशीम कोष बाजारपेठ/६०२१/२०२५ दि.०७.११.२०२५

११. या कार्यालयाची प्रारुप अधिसुचना जा.क्र. जिउनि/कृउबासजालना/ रेशीम कोष बाजार आवार/अधिसुचना/२१७६/२०२५ दि.१५.१२.२०२५

ज्याअर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ मधील कलम ३ मध्ये विनिर्दिष्ट क्षेत्रात कृषि उत्पन्नाच्या खरेदी विक्रीचे नियमन करण्याच्या उद्देशाची अधिसुचना काढणबाबत व कलम ४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कृषि उत्पन्नाच्या खरेदी विक्रीचे बाजार क्षेत्रात नियमन करण्याची घोषणा करणे बाबत तरतुद आहे. तसेच कलम ५ मध्ये बाजाराची स्थापना करणबाबत नमुद करण्यात आले आहे. कलम ५(१) प्रत्येक बाजार क्षेत्रासाठी एक मुख्य बाजार स्थापन करण्यात येईल आणि एक किया अधिक दुय्यम बाजार स्थापन करण्यात येतील अशी तरतूद आहे. कलम ५ (१) मध्ये कलम ४ पोट कलम १ अन्वये अधिसुचना काढल्यांनतर शक्य तितक्या लवकर संचालक, शासकीय राजपत्रातील अधिसुचनेद्वारे, कोणत्याही बाजार क्षेत्रातील (कोणतीही बांधणी), परिवेष्ठीत जागा, खुली जागा किंवा स्थापन धरुन) कोणतीही जागा त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या कृषि उत्पन्नाच्या खरेदी विक्रीसाठी मुख्य बाजार म्हणुन स्थापन करील आणि त्यास त्याच अधिसुचनेद्वारे किंवा सदृश्य अधिसूचनेद्वारे, अशा कृषि उत्पन्नाच्या खरेदी विक्रीसाठी त्या-त्या बाजार क्षेत्रातील त्या सारख्या इतर कोणत्याही जागांमध्ये दुय्यम बाजार स्थापन करता येईल अशी तरतूद आहे.

ज्याअर्थी, वाचा क्रमांक ०२ शासन अधिसुचना व मा. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे वाचा क्रमांक ०३ चे परिपत्रकान्वये महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३, मधील कलम ३, ४ व ५(२) चे अधिकार जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांना प्रदान केलेले आहे.

ज्या अर्थी, वाचा क्र.०४ व ०५ अन्वये रेशीम विकास अधिकारी, जालना यांनी या कार्यालयास सिरसवाडी रोड इन्कम टॅक्स कार्यालयासमोर, राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत रेशीम कोष बाजारपेठ इमारतीची उभारणी केली आहे. सदर ठिकाणी रेशीम उत्पादक शेतकरी तसेच खरेदीदारास निवास, कोष साठविणे, कोष वाळविणे ई. सुविधा निर्माण करण्यास आल्या आहेत, नविन रेशीमकोष बाजारपेठ ईमारतीस रेशीम कोष बाजार क्षेत्र घोषीत करावे. तसेच या नविन ईमारतीमध्ये रेशीम कोषाची खरेदी विक्री करण्यासाठी महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ नुसार सदर नविन इमारतीस रेशीम कोष बाजारपेठ बाजारक्षेत्र घोषीत करुन त्याप्रमाणे बाजारक्षेत्राची अधिसूचना काढणेबाबत विनंती केली आहे.

ज्याअर्थी वाचा क्र.०६ अन्वये सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, जालना यांनी दि.११/१०/२०२४ रोजी ठराव क्र.०६ पारीत करुन सिरसवाडी रोड ईन्कम टॅक्स कार्यालय, जालना समोरील रेशीम कोष इमारतीच्या परिसरास रेशीम कोष बाजार क्षेत्र घोषीत करण्याची विनंती केली आहे. तसेच वाचा क्र. ०७ अन्वये सदर बाबतीत दि.१२/०६/२०२५ रोजी ठराव क्र.०३ मंजुर करुन रेशीम कोष बाजार क्षेत्र घोषीत करण्याची विनंती केली आहे.

ज्या अर्थी वाचा क्र.०८ अन्वये सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, जालना यांनी त्याचे कार्यालयास रेशीम कोष अधिकारी यांनी सादर केलेले बाजारपेठ इमारतीची चर्तुः सिमा, फेरफार उतारा, जमीन हस्तातरीत बाबत मा. जिल्हाधिकारी, जालना यांचे आदेश, जमीन ताबा पावती, करारनामा, नगर परिषदेची बांधकाम मंजुरी, बांधकामाचा प्लॅन व नकाशा, शासन निर्णय व इमारत हस्तांतरण व ताबा पावती ई. कागदपत्रे या कार्यालयास सादर करुन पुढील आवश्यक कार्यवाही करण्याची विनंती केली आहे.

ज्याअर्थी, वाचा क्र.०९ अन्वये या कार्यालयाने रेशीम कोष बाजार क्षेत्र घोषीत करण्याचा प्रस्ताव मा. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना सादर केला होता. त्यानुसार वाचा क्र. १० अन्वये मा. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ मधील कलम ४ (४) नुसार राज्य शासनास, विशिष्ट कृषि उत्पन्नाच्या उलाढालीचा आणि त्यासाठी लागणाऱ्या विशेष पायाभूत सुविधांचा विचार करुन कोणत्याही क्षेत्रासाठी, विद्यमान बाजाराशिवाय विशेष वस्तुंचा बाजार राजपत्रातील अधिसुचनेद्वारे घोषीत करण्याची तरतुद आहे. तसेच कृषि उत्पन्न बाजार समितीचा व बाजार घोषीत करण्याबाबतचा अधिकार संबधित जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांना प्रदान करण्यात आलेले आहे. तसेच कृषि रेशीम कोष बाजारपेठ कृषि उत्पन्न बाजार समिती, जालना येथे सुरु केल्यास जिल्हयातील शेतक-यांना त्यांचा मोठ्या प्रमाणात फायदा होईल. तसेच कृषि उत्पन्न बाजार समितीच्या उत्पन्नातही वाढ होईल. सबब सदरचे वैधानिक काम असल्याने धोरणात्मक निर्णय होवु शकत नाही त्यामुळे कृषि उत्पन्न बाजार समिती, जालना येथे नविन ईमारतीमध्ये रेशीम कोष बाजारपेठ सुरु करणेसाठी, त्यास बाजार क्षेत्र घोषीत करणेसाठी आपलेस्तरावरुन उचित कार्यवाही करावी असे नमुद केले आहे.

आणि, ज्याअर्थी महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम ४४ अन्वये या कार्यालयाने दि.०६/०६/२०२२ रोजी काढलेल्या अधिसुचनेत नियमन केलेल्या कृषि उत्पादित मालाचे यादीमध्ये अ.क्र.६९ वर रेशीम कोषाचे नावाचा समावेश आहे.

ज्याअर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ मधील कलम ३ मध्ये विनिर्दिष्ट क्षेत्रात कृषि उत्पन्नाच्या खरेदी विक्रीचे नियमन करण्याच्या उद्देशाची अधिसुचना काढणेबाबत व कलम ४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कृषि उत्पन्नाच्या खरेदी विक्रीचे बाजार क्षेत्रात नियमन करण्याची घोषणा करणे बाबत तरतुद आहे.

तसेच महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) नियम १९६७ चे ३ नुसार कलम ३ व ४ अन्वये अधिसुचना प्रसिध्द करावयाची रित नमुद असुन नियम ४ अन्वये हरकतीचा आणि सुचनांचा विचार करण्यासाठी चौकशी करण्याची कार्यरिती नमुद आहे.

त्याअर्थी वरील बाबीचा विचार करुन महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ यांतील कलम ३ व ४ (४) व ५ (२)ए अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (विकास व अविनियमन) अधिनियम १९९३ व त्याखालील नियम १९६७ वेळोवेळी निर्गमित परिपत्रकीय सुचना - व कृषि उतपन्न बाजार समिती जालना यांच्या उपविधितील तरतुदीनुसार उक्त विशेष रेशीम कोष बाजार आवाराचे व्यवस्थापन आणि विनियमन करण्यासाठी संदर्भ क्र. ११ दि. १५/१२/२०२५ नुसार प्रारुप अधिसुचना करण्यात आली होती. दि. १७.१२.२०२५ रोजी पार्श्वभूमी व दुनियादारी या दैनिक वृत्तपत्रात व दिनांक १८.१२.२०२५ ते २४.१२.२०२५ या कालावधीचे महाराष्ट्र शासन राजपत्रात अधिसुचना प्रसिध्द करण्यात आली होती.

सदर प्रारुप अधिसुचनेवर काही आक्षेप, हरकत असल्यास ते कार्यालयीन वेळेत सुटीचे दिवस वगळून पस्तीस (३५) दिवसात या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करणे बाबत सदर प्रारुप अधिसुचनेमध्ये नमुद केलेले होते. सदरचे कालावधीत या कार्यालयास तसेच कृषि उत्पन्न बाजार समिती जालना यांचे कार्यालयास सदर प्रारुप अधिसुचेनवर कोणतेही आक्षेप वा हरकत प्राप्त झालेल्या नाहीत.

ज्याअर्थी, जालना कृषि उत्पन्न बाजार समिती कार्यक्षेत्रांतर्गत सिरसवाडी ता. जि. जालना येथील रेशीमकोष बाजारपेठ नवीन ईमारत, सिरसवाडी रोड, स.नं. ४८८ मधील १.०० हेक्टर जमीन सिरसवाडी रोड, ईन्कम टॅक्स कार्यालय, जालना समोरील इमारतीचा परिसर जागा खुल्या जागा सहीत क्षेत्रास महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ व त्याखालील नियम १९६७ मधील तरतुदीनुसार शेतक-यांच्या सोयीसाठी रेशीम या अधिसुचित शेतीमालाची खरेदी विक्रीचे नियमन करण्यात येईल. तसेच या विशेष रेशीम कोष बाजार आवाराचा उपयोग रेशीम उत्पादन, कोष, कच्चा रेशीम आणि इतर संबंधीत विशेष कृषि उत्पादने यांच्या विक्री, खरेदी, भंडारण आणि प्रसंस्करणासाठी प्रायोजित केला जाईल. महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ व त्याखालील नियम १९६७, वेळोवेळी निर्गमित परिपत्रकीय सुचना- व कृषि उत्पन्न बाजार समिती, जालना यांच्या उपविधीतील तरतुदीनुसार उक्त विशेष रेशीम कोष बाजार आवाराचे व्यवस्थापन आणि विनियमन करण्यसाठी पुढील प्रमाणे अधिसुचना प्रसिध्द करित आहे.

## अधिसुचना

महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ मधील कलम ३ व ४ (४) व ५ (२) अन्वये या अधिसुचनेद्वारे जाहिर करण्यांत येते की, उच्चतम कृषि उत्पन्न बाजार समिती, जालना बाजार समितीने सिरसवाडी ता. जि. जालना येथील विशेष रेशीमकोष बाजारपेठ नवीन ईमारत, सिरसवाडी रोड येथे शेतकऱ्यांच्या सोयीसाठी रेशीम या विशेष शेतीपिकाचे खरेदों व विक्रीसाठी विशेष रेशीम कोष बाजार घोषित करुन चालु करणे बाबत प्रशासकीय सभा दिनांक १२.०६.२०२५ मधील ठराव क्रं. ३ संमत केलेला आहे.

कृषि उत्पन्न बाजार समिती, जालना जिल्हा जालना यांचे कार्यक्षेत्रात असलेल्या सिरसवाडी ता. जि. जालना येथील रेशीमकोष बाजारपेठ, नवीन ईमारत, सिरसवाडी रोड, स.नं. ४८८ मधील १.०० हेक्टर जमीन सिरसवाडी रोड, ईन्कम टॅक्स कार्यालय, जालना समोरील इमारतीचा परिसर जागा खुल्या जागा सहीत कृषि उत्पन्न प्राजार समिती, जालनाचा रेशीम या विशेष कृषि उत्पन्नाचा विशेष रेशीम कोष बाजारपेठ घोषीत करण्यात येत आहे.

या घोषीत रेशीम कोष बाजारपेठ क्षेत्राचा उपयोग महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ व त्याखालील नियम १९६७ मधील तरतुदीनुसार अधिसुचित केलेल्या रेशीम उत्पादन, कोष, कच्चा रेशीम, आणि इतर संबंधीत उत्पादने यांच्या विक्री, खरेदी, भंडारण आणि प्रसंस्करणासाठी केला जाईल आणि महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ व त्याखालील १९६७ चे नियम, वेळोवेळी निर्गमित परिपत्रकीय सुचना व कृषि उत्पन्न बाजार समिती, जालना यांच्या उपविधीतील तरतुदीनुसार उक्त विशेष रेशीम कोष विशेष बाजार आवाराचे व्यवस्थापन आणि विनियमन केले जाईल.

कृषि उत्पन्न बाजार समिती, जालना अंतर्गत प्रस्तावीत रेशीमकोष बाजार आवार नवीन ईमारत, सिरसवाडी रोड, स.नं. ४८८ ता.जि.जालना या बाजारपेठचे क्षेत्र १.० हेक्टर जमीनीच्या चतुःसिमा खालीलप्रमाणेः-

पुर्वेस : १८ मीटर रुंद रस्ता व आग्नेय दिशेला मंदीर
पश्चिमेस : स.न.४८८ मधील अतिक्रमीत जागा
उत्तरेस : सिरसवाडी रस्ता, आयकर कार्यालय व रेल्वे लाईन
दक्षिणेस : नाला व स.न. ४८८ चा उर्वरीत भाग

उक्त अधिसूचना शासकीय राजपत्रात प्रसिद्ध झाल्याचे तारखेपासून उक्त विशेष रेशीम कोष विशेष बाजार आवाराचे व्यवस्थापन आणि विनियमन कृषि उत्पन्न बाजार समिती, जालना याचे अधिकारात येईल.

**(संजयकुमार बोराडे)**
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
जालना.

---

६

**उपजिल्हा अधिकारी (अतियात) परतुर, जि. जालना यांजकडून**

**जाहिर प्रगटन**

जा.क्र.२०२/इनाम/जाहिर प्रगटन/कावि/बिडी-२२० :- ज्या अर्थी अर्जदार श्री. रविंद्र पिता प्रभाकर जोशी रा. उमरखेडा, ता. मंठा, जि. जालना ह.मु. कसबा मालीपुरा जालना, ता.जि. जालना यांनी दिनांक २०/०१/२०२६ रोजी या कार्यालयात विहीत नमुन्यात विरासत मंजुरी बाबत अर्ज सादर करुन त्यांचे नावे विरासत मंजुरीची कार्यवाही करणे करीता सदरहु अर्जाद्वारे विनंती केलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात यापुर्वी प्रभाकर हरीभाऊ जोशी यांचे नावे विरासत मंजुर झालेली असल्याचे अर्जदार यांनी अर्जात नमुद केलेले आहे. मुळ इनामदार प्रभाकर हरीभाऊ जोशी हे दिनांक २६/०३/२००९ रोजी मयत झालेले असल्याबाबत अर्जदार यांनी त्यांचे अर्जात नमुद केलेले असुन म्हणुन त्यांचे नावे विरासत मंजुरीची कार्यवाही होणे बाबत विनंती अर्ज सादर केलेला आहे.

प्रस्तुत इनाम जमीनीचा तपशिल अर्जदाराने त्यांचे अर्जात खालील प्रमाणे नमुद केलेले आहे.

| अ.क्र. | गावाचे नाव / तालुका | देवस्थानचे नाव | गट नंबर | क्षेत्र | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | उमरखेडा ता. मंठा | श्री रामचंद्र देवस्थान उमरखेडा | २६७ | १४ हे. ४६ आर<br>पोट खराब ० हे ३५ आर<br>आणि आकार १४.७५ रुपये | |

त्या अर्थी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात / जाहीर करण्यात येते की, उपरोक्त नमुद मिळकतीचे अर्जदाराच्या नावे विरासत मंजुरीचे कार्यवाही बाबत जर कोणास काही आक्षेप अगर हरकत असेल तर त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन सहा आठवड्याच्या आत आपला आक्षेप आगर हरकती लेखी स्वरुपात या कार्यालयात दाखल कराव्यात.

उपरोक्त नमुद मुदतीत जर कोणाचा आक्षेप अगर हरकती प्राप्त न झाल्यास अर्जदार यांच्या नावे त्यांनी विनंती केल्या प्रमाणे उपरोक्त मिळकती बाबत नियमानुसार विरासत मंजुरीची कार्यवाही त्यांचे नावे करयात येईल. तद्नंतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा आक्षेप अगर हरकती विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २२/०१/२०२६ रोजी माझी सहीने व कार्यालयाचे शिक्यानिशी हे जाहीर प्रगटन प्रसिध्दी करीता देण्यात आलेले आहे.

**(पद्माकर गायकवाड)**
**उपजिल्हा अधिकारी (अतियात)**
**परतुर, जि. जालना.**

---

७

**उपजिल्हा अधिकारी (अतियात) परतुर, जि. जालना यांजकडून**

**जाहिर प्रगटन**

जा.क्र.२०२/इनाम/जाहिर प्रगटन/कावि/बिडी-१७७ :- ज्या अर्थी अर्जदार श्री. शशिकांत बाळकृष्ण कवडी, रा. परतुर, ता. परतुर, जि. जालना यांनी दिनांक २७/१२/२०२५ रोजी या कार्यालयात विहीत नमुन्यात विरासत मंजुरी बाबत अर्ज सादर करुन त्यांचे नावे विरासत मंजुरीची कार्यवाही करणे करीता सदरहु अर्जाद्वारे विनंती केलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात यापुर्वी बाळकृष्ण नारायण कवडी यांचे नावे विरासत मंजुर झालेली होती. मुळ इनामदार बाळकृष्ण नारायण कवडी हे दिनांक १६/१०/१९८९ रोजी मयत झालेले असल्या बाबत अर्जदार यांनी त्यांचे अर्जात नमुद केलेले असुन म्हणुन त्यांचे नावे विरासत मंजुरीची कार्यवाही होणे बाबत विनंती अर्ज सादर केलेला आहे.

प्रस्तुत इनाम जमीनीचा तपशिल अर्जदाराने त्यांचे अर्जात खालील प्रमाणे नमुद केलेले आहे.

| अ.क्र. | गावाचे नाव / तालुका | देवस्थानचे नाव | गट नंबर | क्षेत्र | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | परतुर, ता. परतुर | कुरुक्षेत्र महादेव | ११२ | ४ हे ९१ आर | |

त्या अर्थी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात / जाहीर करण्यात येते की, उपरोक्त नमुद मिळकतीचे अर्जदाराच्या नावे विरासत मंजुरीचे कार्यवाही बाबत जर कोणास काही आक्षेप अगर हरकत असेल तर त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन सहा आठवड्याच्या आत आपला आक्षेप आगर हरकती लेखी स्वरुपात या कार्यालयात दाखल कराव्यात.

उपरोक्त नमुद मुदतीत जर कोणाचा आक्षेप अगर हरकती प्राप्त न झाल्यास अर्जदार यांच्या नावे त्यांनी विनंती केल्या प्रमाणे उपरोक्त मिळकती बाबत नियमानुसार विरासत मंजुरीची कार्यवाही त्यांचे नावे करयात येईल. तद्नंतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा आक्षेप अगर हरकती विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २०/०१/२०२६ रोजी माझी सहीने व कार्यालयाचे शिक्यानिशी हे जाहीर प्रगटन प्रसिध्दी करीता देण्यात आलेले आहे.

**(पद्माकर गायकवाड)**
**उपजिल्हा अधिकारी (अतियात)**
**परतुर, जि. जालना.**

---

८

**उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी,धाराशिव, यांजकडून**

**अधिसूचना कलम ११**

**(भूसंपादन अधिनियम-२०१३ चा ३०) मधील कलम ११ अन्वये)**

**क्र. २०२४/भूसंपादन/सिआर-१९४८**

**दिनांक- /०१/२०२६**

**भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३**

ज्या अर्थी, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या खंड कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाव्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन काढण्यात आलेली शासकीय अधिसुचना, महसूल व वन विभाग शासन अधिसुचना क्रमांक MIS-11/ 2014/CR-77(PART-2)/A-2 DATED-11/09/2015 (यात या पुढे जिचा निर्देश उक्त अधिसुचना असा करण्यात आला आहे) याव्दारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ खंड (झेड अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखादया सार्वजनिक प्रयोजनासाठी एखादया जिल्हयातील १०,००० हेक्टर अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमीन संपादन करण्याच्या संबंधात अशा जिल्हयाचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याने मानण्यात येईल.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसुचनेनुसार समुचित शासन असलेल्या उस्मानाबाद जिल्हयाच्या जिल्हाधिका-यांस यासोबत जोडलेल्या अनुसूची मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमिन (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त जमिन असा करण्यात आला आहे) संपादनाची कार्यवाही ही सार्वजनिक प्रयोजनासाठी (यापुढे ज्याचा निर्देश उक्त सार्वजनिक प्रयोजन असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते ज्याच्या स्वरुपाचे विवरण या सोबत जोडलेल्या अनुसूची दोनमध्ये दिलेले आहे, आणि म्हणूनच उक्त अधिनियमांच्या कलम ११ च्या पोटकलम (०१) च्या तरतुदीन्वये याव्दारे असे सूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

ज्याअर्थी, प्रस्तावित भूमी संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, या सोबत जोडलेल्या अनुसूची तीन मध्ये दिलेली आहेत. (सदर प्रकल्पात कोणत्याही व्यक्तीचे विस्थापन होणार नाही)

ज्याअर्थी कलम ४३ च्या पोटकलम (१) अन्वये पुनर्वसन व पुर्नवसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील या सोबत जोडलेल्या अनुसूची पाच मध्ये दिलेला आहे ( सदर प्रकल्पात पुनर्वसन व पुर्नवसाहत करण्याची आवश्यकता नाही.)

त्या अर्थी, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम ४ अनुसार कोणतीही व्यक्तीही अधिसुचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल उक्त जमिनीचा अथवातिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवरकोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतु उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर,जिल्हाधिका-यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूदअशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल.

परंतु, अणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुध्दीपुरस्सर उल्लंघन केल्यास त्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिका-यांकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (५) नुसार जिल्हाधिकारी भूमीसंपादन, पुनर्वसन व पुर्नवसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क नियम महाराष्ट्र २०१४ ( यात यापुढे ज्यांचा निर्देश उक्त नियम असा करण्यात आला आहे.) यांच्या नियम १० च्या उप नियम (३) व्दारे विहीत केल्याप्रमाणे भूमिअभिलेखाच्या अद्यावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पुर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यत येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये समुचित शासन असलेल्या जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी **उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, धाराशिव,जिल्हा धाराशिव** यांस पदनिर्देशित केले आहे.

**(ओंकार देशमुख)**
**उपविभागीय अधिकारी**
**तथा भूसंपादन अधिकारी,धाराशिव.**

**अनुसूची एक**
**जमिनीचे वर्णन**
**कोट टेकडी या राज्यसंरक्षित स्मारकाच्या लगत असलेल्या जागेसाठी भूसंपादन**
**मौजे - तेर ता. जि. धाराशिव**

| अ.क्र. | भूमापन किंवा गट क्रमांक | अंदाजित क्षेत्र हे. आर मध्ये |
|---|---|---|
| १. | २ | ३ |
| १. | न.भू.क्रमांक ७० | १.०५६ हे. आर |
| | एकुण | १.०५६ हे. आर |

**(ओंकार देशमुख)**
**उपविभागीय अधिकारी**
**तथा भूसंपादन अधिकारी,धाराशिव.**

**अनुसूची दोन**
**सार्वजनिक प्रयोजन स्वरुपात विवरण.**

**प्रकल्पाचे नाव** - कोट टेकडी या राज्यसंरक्षित स्मारकाच्या लगत असलेल्या जागेसाठी भूसंपादन मौजे तेर, ता.जि. धाराशिव

**प्रकल्पाचे वर्णन** - कोट टेकडी या राज्यसंरक्षित स्मारकाच्या लगत असलेल्या जागेसाठी भूसंपादन मौजे तेर, ता.जि. धाराशिव

**समाजाला मिळणारे लाभ** -कोट टेकडी या राज्यसंरक्षित स्मारकाच्या लगत असलेल्या जागेसाठी भूसंपादन मौजे तेर, ता.जि. धाराशिव या भूसंपादनामुळे कोट टेकडी तेर, ता.जि. धाराशिव या राज्य संरक्षित स्मारकाचे जतन व संवर्धन तसेच परिसर विकास होणार आहे.

**अनुसूची तीन**
**बाधीत व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे**

सदरच्या भूसंपादन प्रक्रीयेमुळे सदरील गावातील कोणतीही व्यक्ती/ कुटुंब सद्दस्थितीमध्ये विस्थापीत होत नाहीत.

**अनुसूची चार**
**(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणा-या अधिका-याने दिलेला सामाजिक प्रभाव निर्धारण सारांश)**

भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ मधील कलम ६ (०२) नुसार जर कालवे काढण्याच्या योजना असतील जेथे पर्यावरण प्रभाव आकारणीची कारवाई ही एखाद्या कायद्यान्वये किंवा भविष्यात येणा-या संदर्भिय अधिनियमाच्या कायद्यान्वये दिलेल्या तरतुदीनुसार अनिवार्य असेल तर तेथे सामाजिक प्रभाव आकारणी लागु पडत नाही. परंतु खाजगी वाटाघाटीने खाजगी जमीन थेट खरेदी प्रस्तावास शेंतक-यांचा विरोध असल्याने भूसंपादन कायदा २०१३ अन्वये सक्तीचे भूसंपादन करण्यात येत आहे. प्रकरणी सामाजिक आघात निर्धारण अभ्यास करण्याची आवश्यकता नाही.

**अनुसूची पाच**
**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील**

अ - प्रशासक म्हणुन नियुक्त करण्यात आलेल्या अधिका-याचे पदनाम - लागु नाही.

ब - प्रशासनाच्या कार्यालयाचा पत्ता - लागु नाही.

क - ज्या अधिसुचनाव्दारे प्रशासकाची नियुक्तीकरण्यात आली आहे त्या अधिसुचनेचा तपशील - लागु नाही.

**टीप**- १. सदर प्रकल्पासाठी होणा-या भूसंपादनामुळे कुठल्याही व्यक्तीचे पुनर्वसन करण्याची आवश्यकता नाही, त्यामुळे अधिनियम ४३ अन्वये प्रशासकाची नियुक्ती केलेली नाही.

२. उक्त जमिनीच्या आराखडयाचे **उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, धाराशिव यां**चे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

सदर अधिसुचनेव्दारे ज्या जमिनीची सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासण्याचा संभव असल्याचे कायदयाचे कलम ११ चे उप कलम ०१ खाली अधिसुचीत करण्यात आले आहे. प्रारंभिक अधिसुचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासुन (६०) दिवसाच्या आत **उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, धाराशिव** यांचे कार्यालयात आक्षेप नोंदविता येईल.

**दिनांक :- १९.०१.२०२६**
**ठिकाणः- धाराशिव**

**(ओंकार देशमुख)**
**उपविभागीय अधिकारी**
**तथा भूसंपादन अधिकारी,धाराशिव.**

९

**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांजकडून**

**अधिसुचना**

**जा. क्र. वि-१/महाराष्ट्र जनकल्याण अर्बन को-ऑप क्रेसो लि, लातूर/अधिसुचना/३११५/२०२५ दिनांक :- १२/०९/२०२५** मी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर याद्वारे अधिसुचित करीत आहे कि, **महाराष्ट्र जनकल्याण अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि, लातूर ता.जि.लातूर** ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९ (१) अन्वये नोंदविण्यात आली असून तिचा नोंदणी क्रमांक :- **एलटीआर/आरएसआर (सीआर)/१५८५/२०२५ दिनांक. १२/०९/२०२५** असा आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम १२ (१) व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम १० (१) अन्वये संस्थेचे वर्गीकरण **" साधन संपत्ती संस्था"** व उपवर्गीकरण **" कर्ज देणाऱ्या साधन संपत्ती संस्था"** असे करण्यात आलेले आहे.

**(एस.व्ही.बदनाळे)**
**जिल्हा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था,लातूर.**

१०

**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांजकडून**

**अधिसुचना**

**जा. क्र. वि-१/शिवतीर्थ अर्बन को-ऑप,क्रेसो लि, लातूर/ अधिसुचना/३१४७/२०२५ दिनांक :- १६/०९/२०२५** मी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर याद्वारे अधिसुचित करीत आहे कि, **शिवतीर्थ अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि, लातूर ता. लातूर जि. लातूर** ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९ (१) अन्वये नोंदविण्यात आली असून तिचा नोंदणी क्रमांक :- **एलटीआर/आरएसआर (सीआर)/१५८६/२०२५ दिनांक. १६/०९/२०२५** असा आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम १२ (१) व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम १० (१) अन्वये संस्थेचे वर्गीकरण **" साधन संपत्ती संस्था"** व उपवर्गीकरण **" कर्ज देणाऱ्या साधन संपत्ती संस्था"** असे करण्यात आलेले आहे.

**(एस.व्ही.बदनाळे)**
**जिल्हा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था,लातूर.**

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR RUPENDRA DINESH MORE. PRINTED AT GOVERNMENT PRESS, PAITHAN ROAD, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR-431 005 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR RUPENDRA DINESH MORE.